# गावाच्या शाश्वत विकासासाठी सामूहिक स्वयंचलित ठिबक सिंचन आवश्यक- डॉ. नेताजी पाटील

"कारभारवाडी सारख्या चारशे चार लोकसंख्या व बहात्तर घरे असणाऱ्या लहानशा खेडेगावाच्या विकासास केवळ आणि केवळ तेथे राबवली गेलेली सामुदायिक स्वयंचलित ठिबक सिंचन व्यवस्था कारणीभूत ठरली आहे. सामुदायिक स्वयंचलित ठिबक सिंचनाद्वारे कमीत कमी पाण्याच्या वापरातून जास्तीत जास्त पिके घेऊन गावातील शेतकरी समाधानकारक शेती व्यवसाय करत असून संपूर्ण गावाचा कायापालट या व्यवस्थेमुळे झाला असे मत दूधसागर महाविद्यालय, बिद्री येथील प्रा. डॉ. नेताजी पाटील यांनी केले ते श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'शाश्वत विकासासाठी जलसंवर्धन' विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेमध्ये बोलत होते." कार्यशाळेच्या प्रथम सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले डॉ. नेताजी पाटील यांनी 'शाश्वत गाव विकासासाठी सामुदायिक स्वयंचलित ठिबक सिंचन' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रासायनिक खतांचा वाढता वापर पिकांचे उत्पादन कमी होण्यावर होत असून, पाटपाणी, शेत जमिनीचे तुकडीकरण, एकत्र कुटुंब पद्धतीचा ह्रास, शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा स्तर व खर्च यातील असमतोल, शेती पूरक उद्योगांचा ह्रास अशा प्रकारच्या अनेक समस्यांवर त्यांनी भाष्य केले. कारभारवाडी हे त्यांचे गाव व या गावातील लोकांच्या दृष्टिकोनामध्ये केलेला सकारात्मक बदल, तंटामुक्त गाव, गट शेती, महिला गृह उद्योग, महिला बचत गटाच्या माध्यमातून उद्योगांमध्ये महिलांचा समावेश याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. तर कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये पर्यावरण स्नेही असणारे श्री. संजय पाटील, सुटा संघटनेचे सचिव यांनी 'जलसाक्षरता आणि संवर्धन' विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जलसंवर्धनासाठी खूप मोठे व अवाढव्य असे काही करण्याची गरज नसून छोट्या, छोट्या गोष्टी करणे व जग बदलण्याच्या फंदात न पडता बदलाची सुरुवात आपल्या स्वतः पासून करणे आवश्यक आहे असे स्वतःच्या उदाहरणाचा दाखला देताना ते म्हणाले. पाण्याचा होणारा गैरवापर, अतिवापर, पाण्याच्या वापराबाबतचे अज्ञान ई. बद्दल माहिती सांगून जलसंवर्धनासाठी जलसाक्षरता अत्यंत महत्त्वाची आहे असे ते म्हणाले. सर्वात जास्त पाऊस पडण्यामध्ये भारत देशाचा दुसरा क्रमांक आहे व पाण्याची कमतरतेमध्ये देखील भारताचा दुसरा क्रमांक लागतो असा हा विरोधाभास असून पाण्याच्या वापराबाबत लोकांनी जागरूक होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कार्यशाळेच्या अध्यक्ष स्थानी असणारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी आजच्या कार्यशाळेचा विषय हा आजच्या काळाची गरज बनली आहे, येणारा काळ हा पाण्याच्या भीषण संकटाचा काळ असून दुष्काळ सारखे संकट ओढण्याची शक्यता त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये व्यक्त केली. कार्यशाळेच्या प्रमुख पाहुण्यांची ओळख व प्रास्ताविकाची भूमिका आग्रणी महाविद्यालय योजनेच्या समन्वयिका डॉ. एस एन. जरंडीकर मॅडम यांनी पार पाडली. तर सदर कार्यशाळेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शनाची जबाबदारी अनुक्रमे सहाय्यक प्राध्यापिका मोहिनी अंचलीया व सहाय्यक प्राध्यापक श्री. एस. बी. मलघाण यांनी पार पाडली. विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी कार्यशाळेसाठी उपस्थित होते


"Water Conservation for Sustainable Development"
Shri Venkatesh Mahavidyalaya,